REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सहभागितेचा महिला सदस्यांच्या जीवनावर झालेल्या सकारात्मक प्रभावाचे अध्ययन

वंदना कुबडे[1] , डॉ. जे. पी. देशमुख[2]
[1]संशोधिका
[2]मार्गदर्शक,आदर्श महाविद्यालय, वडसा जि. गडचिरोली.

## सारांश

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यातील ३५ बचतगटातील प्रत्येकी १० बचत गट सदस्यांकडून म्हणजेच एकूण ३५० बचत गट सदस्यांकडून संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान सार्थकता स्तर तपासण्याकरीता Non-Parametric Chi Square Test (गैर-प्राचल काई वर्ग परिक्षण) या सांख्यिकीय चाचण्यांचा वापर करण्यात आला. विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले.

## प्रस्तावना

बचत गटांच्या चळवळीचे जनक नोबेल पुरस्कार विजेते डॉ. महमंद युनूस यांनी महिलांमध्ये बचत गटांच्या माध्यमातून कमालीचा आत्मविश्वास निर्माण केला. ग्रामीण बँकेसारखी संकल्पना राबवून गरिबी निर्मुलनाचा जणू त्यांनी वसाच घेतला. आज जगभरात बचत गटांची चळवळ फोफावली आहे. १९८२ पासून बचत गट स्थापना व निर्मितीस मोठ्या प्रमाणावर वेग आला. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) हे गट आणि बँकांकडून होणाऱ्या पतपुरवठ्याची सांगड घातल्यानंतर बचतगट चळवळ व्यापक होत गेली. देशात एकुन ४० लाख बचत गट आहेत. त्यापैकी ३० लाख गटांना कर्ज व अनुदानापोटी आठ हजार कोटीची मदत शासनाने केली आहे. या वर्षी दहा हजार कोटी रूपयापर्यंत मदतीचा आकडा जाईल. विशेष म्हणजे कर्ज परतफेड प्रमाणपत्र ८६ टक्के आहे. हे प्रमाण उद्योग शेती कर्जाच्या तुलनेत कौतुकास्पद आहे. महिला बचतगट स्थापल्यामुळे ग्रामीण विभागातील महिलांना आत्मसन्मान मिळाला आहे.



महाराष्ट्रापुरते बोलायचे तर बहुतेक जिल्ह्यांमध्ये या बचत गटांचे जाळे पसरले आहे. शेतीच्या उत्पन्नातून किंवा कुटुंबाच्या पारंपारिक व्यवसायातून मिळणारा पैसा घरात खर्च होत असला तरी घरच्या बाईच्या हातात तो नसायचा. तिला तिच्या मर्जीप्रमाणे पैसे खर्च करणे किंवा कुटुंबाच्या कमाईला हातभार लावणे शक्य होत नसे. बचत गटांच्या माध्यमातून पैसा थेट तिच्या हातात गेला. पुरुषांपेक्षा स्त्रिया उत्तम व्यवस्थापक असल्यामुळे त्याचे योग्य नियोजन करुन स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांना एक पर्याय खुला झाला त्यातुनच खूप मेहनतीने खाद्र्यपदार्थ, उदबत्या, मेणबत्त्या, फराळ, मसाले असे विविध उद्र्योग महिलांनी उभे करुन स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न केला. अत्यंत गरीब परिस्थितीतून येऊन बचत गटांच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभा राहिलेल्या महिलांच्या यशस्वी कहाण्या महाराष्ट्रामध्ये खुप सांगता येतील.

मात्र गेली २० वर्षे ही चळवळ ज्या पद्धतीने पसरायला हवी होती आणि तिचा उद्द्देश सफल व्हायला हवा होता, तसा झालेला नाही. बचत गटामुळे गरिबी निर्मूलनही झालेले नाही. किंबहुना राष्ट्रीय बँकाची आडमुटी धोरणे, बचत गटांना सरकारची मदत नसणे, अल्प कर्जपुरवठा संस्थांचे (मायक्रो फायनान्स इन्सिटट्यूट) कर्जाचे अव्वाच्या सव्वा दर आणि राजकीय पक्षांकडून बचत गटांना होणारा वापर अश विविध कारणांमुळे महिला बचत गटांच्या या चळवळीला घरघर लागल्याचे दिसते. या सर्व पार्श्वभुमीवर सदर अभ्याचे महत्व अनन्य साधारण असे आहे.

गडचिरोली जिल्ह्याची आर्थिक सामाजिक पार्वभुमी इतर जिल्ह्याच्या तुलनेत वेगळी आहे. त्या मुळे महिला बचत गटांची कार्यप्रणाली व त्यांच्या समोरील अळथळे यांचा गडचिरोली जिल्ह्याच्या पार्श्वभुमीवर अभ्यास करून त्याचा संशोधात्मक निष्कर्श समोर मांडने खुप गरजेचे आहे.

महिला बचत गटांची आजची स्थिती व भविष्यातील संभावित धोरणात्मक वाटचाल या सर्वाचे शास्त्रीय पद्धतीने विवेचन करून एक दिशादर्शक अभ्यास सर्वांसमोर येणे गरजंचे असल्याने सदर विषयाची निवड महत्वाची ठरते.

**सारणी क्रमांक १: बचत गट सदस्यांच्या सामाजिक सहभागात बचत गटामुळे झालेल्या वाढसंबंधी माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गटामुळे सामाजिक सहभागात वाढ | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३५० | १००.० |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सदस्यांच्या सामाजिक सहभागात बचत गटामुळे झालेल्या वाढसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार १००.० टक्के बचत गट सदस्यांच्या सामाजिक सहभागात बचत गटामुळे वाढ झाली आहे. म्हणजेच गडचिरोली जिल्ह्यातील सर्व बचत सदस्यांच्या सामाजिक सहभागात बचत गटामुळे वाढ झालेली आहे.

**सारणी क्रमांक २: बचत गटातील सहभागितेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सदस्यांना सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात झालेल्या वाढसंबंधी माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गटातील सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात वाढ | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३३५ | ९५.७ |
| सांगता येत नाही | १५ | ४.३ |
| **एकूण** | **३५०** | **१००.०** |
| **Chi-Square** | **df** | **Sig** |
| **323.189** | **1** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये बचत गटातील सहभागितेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सदस्यांना सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात झालेल्या वाढसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९५.७ टक्के बचत गट सदस्यांना बचत गटातील सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात वाढ झाली आहे. तसेच ४.३ टक्के बचत गट सदस्यांनी बचत गट सहभागामुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात झालेल्या वाढसंबंधी अनिश्चितता दर्शविली. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, बचत गटातील सदस्यांना बचत गट सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात झालेल्या वाढीनूसार गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ३२३.१८९; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात वाढ अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ३: बचत गटातील सहभागितेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सदस्यांचा आत्मविश्वास वाढला असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गटातील सहभागितेमुळे आत्मविश्वासात वाढ | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३५० | १००.० |

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये बचत गटातील सहभागितेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सदस्यांचा आत्मविश्वास वाढला असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार १००.० टक्के बचत गट सदस्यांचा बचत गटातील सहभागितेमुळे आत्मविश्वास वाढला आहे. म्हणजेच बचत गट सहभागितेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील सर्व बचत गट सदस्यांच्या आत्मविश्वास मध्ये वृद्धी झाली आहे.

**सारणी क्रमांक ४: बचत गटातील सहभागितेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सदस्यांच्या आत्मसम्मानात वाढ झाली असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| आत्मसम्मानात वाढ | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३४६ | ९८.९ |
| नाही | ४ | १.१ |
| **एकूण** | **३५०** | **१००.०** |

उपरोक्त सारणी क्रमांक ४ मध्ये बचत गटातील सहभागितेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सदस्यांच्या आत्मसम्मानात वाढ झाली असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९८.९ टक्के बचत गट सदस्यांच्या आत्मसम्मानात बचत गटातील सहभागितेमुळे वाढ झाली आहे. तसेच बचत गट सहभागितेमुळे आत्मसम्मानात वाढ झाली नसणाऱ्या बचत गट सदस्यांची टक्केवारी १.१ टक्के होती. म्हणजेच गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे आत्मसम्मानात वाढ झाली असणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ५: बचत गट सदस्यांच्या राहत्या परिसरात बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गटामुळे परिसरातील स्त्रियांचे सक्षमीकरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३३१ | ९४.६ |
| सांगता येत नाही | १९ | ५.४ |
| **एकूण** | **३५०** | **१००.०** |
| **Chi-Square** | **Df** | **Sig.** |
| **285.951** | **1** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक ५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सदस्यांच्या राहत्या परिसरात बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९४.६ टक्के बचत गट सदस्यांच्या राहत्या परिसरात बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले आहे. तसेच ५.४ टक्के बचत गट सदस्यांनी राहत्या परिसरात बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले असण्याबाबत अनिश्चितता दर्शविली. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, बचत गटातील सदस्यांच्या राहत्या परिसरात बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले असणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – २८५.९५१; $P<0.05$) फरक आहे. म्हणजेच गडचिरोली जिल्ह्यातील राहत्या परिसरात बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले असणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

## निष्कर्ष

गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सहभागितेचा सदस्यांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव झाला असून, बचत गट सहभागितेमुळे सदस्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे. बचत गट सहभागितेमुळे जीवनाच्या स्तरात सुधारणा अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे सदस्यांची कौटुंबिक निर्णय पद्धतीमधील सहभागितेत वाढ झाली आहे. बचत गट सदस्यांच्या सामाजिक सहभागात बचत गटामुळे वाढ झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात वाढ अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे. बचत गट सदस्यांचा बचत गटातील सहभागितेमुळे आत्मविश्वास व आत्मसम्मान वाढला आहे. बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले आहे.

## संदर्भ


१) महिला व बालकल्याण शासन निर्णय, यशदा प्रकाशन पुणे.
२) मुलाणी एम.यु., (२००८), अल्पबचत नियोजन (बचत गट), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पृ. ११.
३) मुलानी, एम.यु. (२००६).‘महिला स्वयंसहाय्यता बचतगट’ डायमंड पब्लीकेशन पुणे -३० पेज. ५८-५९
४) चौधरी, राजेश ‘महिला बचत गट हस्तपुस्तीका’ चौधरी लॉ पब्लीशर्स जळगांव, पुणे. पेज ९१ ते ९३.
५) गोटे, शुभांगी (२००४). ‘महिला सबलीकरण स्वरूप व समस्या’ वरद पब्लीकेशन औरंगाबाद पेज नं. ६५ -८५.